Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक सुधारणेत योगदान

**यमुना चंद्रकांत ढेंबरे**
संशोधक विद्यार्थिनी (पीएचडी.)
जालना समाजकार्य महाविदयलय, जालना.
dhyamuna@gmail.com

**प्रस्तावना:**

राजर्षी शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाज सुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली होती. 1894 मधील त्यांच्या राज्याभिषेक पासून ते 1922 मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातीतील लोकांसाठी कार्य केले. जात, पंथाची परवा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. ब्रिटिश राज सत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू महाराजांनी प्रयत्न केले. तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित, अस्पृश्य, मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी त्यांना त्यांच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्याला फुले शाहु आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात.

राज घराण्यातील ब्राह्मण पुरोहितांनी वैदिक स्त्रोतानुसार ब्राह्मणेतरांचे संस्कार करण्यास नकार दिल्याने शाहूंनी आर्य समाज आणि सत्यशोधक समाजाला पाठिंबा देण्याबरोबरच मराठा समाजाच्या हक्कांसाठी प्रचार केला. त्यांनी पुजाऱ्यांना हटवून क्षात्रा जगतगुरु (क्षत्रियांचे विश्वगुरू) ही पदवी देऊन एका तरुण मराठी ब्राह्मणेतरची धर्मगुरू म्हणून नियुक्ती करण्याचे धाडसी पाऊल उचलले. याला वेदोक्त वाद म्हणून ओळखले जाते. ते लवकरच ब्राह्मनेतर चळवळीचे नेते बनले आणि मराठ्यांना त्यांच्या झेंड्याखाली एकत्र केले.

**सामाजिक चळवळीतील योगदानाचे कार्य:**

प्रथमतः शाहू महाराजांनी मागास बहुजन समाजाच्या प्रगतीचे व त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्याचे कार्य हाती घेतले. पहिल्यांदा त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व

मोफत करण्याचा निर्णय घेतला व तो निर्णय यशस्वीपणे यशस्वी करण्यात त्यांना चांगल्या प्रमाणात यश मिळाले. स्त्रियांच्या  शिक्षणाच्या बाबतीतील स्थितीचा अभ्यास करून स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्याची राजअज्ञा काढली. समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी 1919 सली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. राज्यातील परिणामी समाजातील जातीभेद नष्ट व्हावा या हेतूने त्यांनी आंतरजातीय विवाह करण्यास प्रोत्साहन देण्याचे कार्य सुरू केले. आंतरजातीय विवाह हा समाजमान्य व्हावा यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा निर्माण केला. इसवी सन 1917 सालि त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा निर्माण केला. बहुजन समाजाला राज प्रक्रियेच्या निर्णय प्रक्रियेत त्यांना सामावून घेण्यासाठी त्यांनी इसवी सन 1916 साल निपाणी येथे "डेक्कन रयत असोसिएशन "ही संस्था स्थापन केली.

वेदोक्त काळ हा शाहू महाराजांनी सुरू केलेल्या सामा जिक बदल होता. वेदोक्त मंत्र म्हणण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे हे त्यांनी त्यांच्या काळात निशिद्ध मानले होते.

मराठा किंवा कोणालाही मंत्र म्हणण्याचा अधिकार त्यांनी मिळवून दिला होता. 1896 च्या दुष्काळी भीषण परिस्थितीत व त्यानंतर आलेल्या प्लेग च्या साथीच्या भयानक परिस्थितीमध्ये त्यांनी समाजासाठी धान्य दुकान, तागवाटप, निराधार आश्रमाची स्थापना केले.हे कार्य पाहता असा राजा होणे नाही असेच प्रजेला वाटते. या काळात त्यांची कसोटी लागली व त्यासाठी ते खरे उतरले असे दिसते.

शेतकऱ्यासाठी त्यांनी राधानगरी धरणाची उभारणी केली. शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे अशा उपक्रमातून त्यांनी कृषी विकासाकडे देखील लक्ष पुरवले .व्यापारासाठी त्यांनी शाहू परी व्यापार पेठ निर्माण केली. तसेच शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्था स्थापन केल्या.

राजर्षी शाहू महाराजांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी तसेच बाबासाहेबांच्या "मूकनायक" या वृत्तपत्रासाठी मोलाचे सहकार्य केलेले आहे.

स्वातंत्र्यापूर्वी कित्येक वर्ष आधी समता, बंधुता ,धर्मनिरपेक्षता सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्वे शाहू महाराजांनी  करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात" महाराजांचे महाराज" असा गौरव होतो. रयत प्रजा उ पेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य छत्रपतींनी केले. त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी बहुजन समाजाला त्यांचे हक्क व न्याय

मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकारांचा पूर्णपणे वापर केला. म्हणून त्यांचे राज्य कल्याणकारी राज्य ठरले ..

शाहू महाराजांना बहुजनांविषयी आत्मीयता, तळमळ होती. म्हणूनच त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले .त्याचा कायदा बनवण्यात आला. तसेच त्यांनी जिथे 500 ते 1000 लोकवस्तीच्या गावामध्ये शाळा घडल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत अशा पालकांना महिन्याला एक रुपया दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद त्यांनी केली.

अस्पृश्य लोकांची सामाजिक तसेच आर्थिक प्रगती, विकास होण्यासाठी शाहू महाराजांनी त्यांना स्वतंत्र हॉटेल्स ,दुकाने व इतर व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. तसेच मदत म्हणून त्यांना आर्थिक मदतही देऊ केली.sparsh- अस्पृश्य भेदभाव मिटवण्यासाठी शाहू महाराजांनी पैलवान पंडित अशा पदव्या दिल्या .तसेच सुशिक्षित अस्पृश्य मुलांची तलाठी म्हणून नेमणूक केली होती.

शाहू महाराजांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठी कायद्याची निर्मिती केली होती. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी त्यांनी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकरी मिळून दिल्या .शाळा दवाखाने पानवटे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी तत्कालीन अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून सहा जुलै 1902 रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना 50 टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला. त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या, मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. अशाप्रकारे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी समाजाच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे...

**संदर्भ :**

भगत रा. तू .(2016). राजर्षी शाहू छत्रपती -जीवन व शिक्षण कार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन pp 41 ते 142

2)जाधव ,नरेंद्र (1980) .महाराष्ट्रातील मानचिन्हे, पुणे: मॅजेस्टिक प्रकाशन.

3) काशिनाथ कवळेकर(1979) नॉन ब्राह्मण मोमेंट इन sauthern इंडिया. 1873- 1949.

4) माइक शेपर्डसन, कॉलिंन सिमोन्स(1988). द इंडियन नॅशनल काँग्रेस अँड द पॉलिटिकल इकॉनोमी ऑफ इंडिया, 1885 .

6)भगत ,प्राचार्य रा.तू.(2016). राजर्षी शाहू महाराज -जीवन व शिक्षण कार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन ,कोल्हापूर.

7) नांदेडकर, प्राध्यापक डॉक्टर व. गो .(2011). राजकीय विचार आणि विचारवंत -पुणे डायमंड पब्लिकेशन्स .

8)सर्वांगपुरुष राष्ट्र पुरुष राजर्षी शाहू महाराज यांचे आज जयंती.( महाराष्ट्र टाइम्स ).

9)शाहू छत्रपती बायोग्राफी- शाहू छत्रपती लाईफ अँड प्रोफाईल. कल्चरल इंडिया...